वाचून:- १) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत देणेत आलेली जाहिरात दिनांक २९-१२-२०२५
२) नियुक्ती आदेश देणेबाबतची मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सातारा यांची मंजुर टिपणी दिनांक 25/2/2026

---

जा.क्र/आरोग्य/आस्था/नियुक्ती/963/२६
राष्ट्रीय आरोग्य अभियान, जि.प. सातारा
दि:- २३/०२/२०२६

## नियुक्ती आदेश

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत **आशा गटप्रवर्तक** कंत्राटी पध्दतीने खालील नमुद अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक२५/०२/२०२६ ते दिनांक २९/०६/२०२६ पर्यंत निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीनुसार नियुक्ती आदेश देणेत येत आहे.

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | कार्यक्रमांचे नाव | नियुक्ती ठिकाण | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | Suryawanshi Priyanka Amol | आशा गटप्रवर्तक | जिल्हा परिषद सातारा | Rs.८७७५/- |

**अटी व शर्ती:-**

- राष्ट्रीय आरोग्य अभियान, जि.प. सातारा मुख्य कार्यालयाकडून पारित केलेले आदेश (नियुक्ती, पुनर्नियुक्ती आदेश) सर्व राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अधिकारी/कर्मचारी यांना लागू राहतील.
- नियुक्ती देणेत आलेल्या उमेदवारांनी नियुक्ती दिलेल्या दिनांकापासुन पुढील ७ दिवसांत हजर होणे बंधनकारक आहे. तरी ७ दिवसात हजर न झालेस सदर उमेदवारांस नोकरीची गरज नाही.
- नियुक्ती किंवा नविन नियुक्ती आदेश या कार्यालयाकडून ज्या अधिकारी/कर्मचारी यांना देणेत आलेली आहे त्या अधिकारी/कर्मचारी यांची बदली किंवा प्रतिनियुक्ती इतर कोणत्याही विभागात किंवा त्याच विभागात करता येणार नाही.
- या कार्यालयाकडुन देणेत आलेला नियुक्ती आदेश किंवा नियुक्ती आदेशाने नेमणुक करणेत आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना राजीनामा द्यावयाचा असेल तर जिल्हा कार्यालयाकडुन राजीनामा मंजुर होईपर्यंत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना संस्था स्तरावरुन कार्यमुक्त करता येणार नाही. कर्मचारी कार्यमुक्तीचे आदेश एनएचएम जिल्हा कार्यालयाकडुन मा. मु.का.अ. यांची मंजुरी घेतलेनंतर निर्गमित करणेत येतील.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करीत असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांना आपला स्वत:चा मोबाईल फोन २४ तास जिल्हा कार्यालयाशी संपर्कात ठेवावा लागेल.
- **मनुष्यबळ धोरणे (मा. सहसंचालक (अतांत्रिक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे जा.क्रंराआसोमु/मनुष्यबळ/HR Policy/६५५२३/७८४ दिनांक ०९/०९/२०२४) या पत्रानुसार अटी व शर्ती लागु राहतील**
- सुट्टीच्या दिवशी कार्यालयाचे काम केले असल्यास त्यासाठी बदली सुट्टी मंजुर नाही.
- कार्यालयाची वेळ सकाळी ०९.४५ ते ०६.१५ पर्यंत राहील. वैद्यकिय सेवा पुरविणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यालयीन वेळ ओपीडी/आयपीडी तासाप्रमाणे राहील.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी नियुक्ती कालावधी संपणेपुर्वी १ महिना अगोदर नियुक्ती प्रस्ताव जिल्हा कार्यालयाकडील पत्र मिळालेनंतर मुदतीत सादर करावा. नियुक्ती प्रस्ताव वेळेत सादर न केलेस संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पुढील कालावधीसाठी नियुक्तीची आवश्यकता नाही असे समजुन संबंधितांना कामावरुन कमी केले जाईल.

- सदरची नेमणुक तात्पुरत्या स्वरुपाची असुन कंत्राटी कालावधी संपल्यानंतर संबंधित पदावरील आपली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल यासाठी आपणांस कोणत्याही प्रकारची पूर्वसुचना व कारण न देता कमी करण्याचा हक्क जिल्हास्तरावर राखुन ठेवलेला आहे.
- उमेदवारास त्यागपत्र/राजीनामा द्यावयाचे झाल्यास १ महिन्याची आगाऊ नोटीस अथवा १ महिन्याचे मानधन रोख भरावे लागेल. सदरची नेमणुक चांगल्या वर्तणुकीवर अवलंबुन राहील.
- वार्षिक कामाचे अहवालावरुन मुल्यमापन केले जाईल, काम असमाधानकारक आढळल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता कामावरुन कमी करणेत येईल.
- केंद्र शासनाने एखादे पद नामंजुर केल्यास त्या पदावर नेमणुक करणेत आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येतील.
- दिनांक २५ /०२/२०२६ ते दिनांक २९/०६/२०२६ या कालावधीची नियुक्ती प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०२५-२६ च्या अधीन राहुन देणेत येत आहे. केंद्र शासनाने सन २०२५-२६ करीता कोणत्याही पदास मान्यता दिली नाही अथवा भविष्यात इतर कोणतीही अपवादात्मक परिस्थिती उदभवल्यास सदर पदावरील कर्मचा-यांची सेवा कोणतीही पूर्वसुचना व कोणतेही कारण न देता तात्काळ संपुष्टात आणली जाईल.
- मा. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या संदर्भ क्र १ च्या पत्रानुसार एनएचएम अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या पदस्थापनेत बदल करण्याबाबतचे कोणतेही अर्ज अथवा शिफारस जिल्हा आरोग्य सोसायटीस सादर करु नयेत, तसेच अर्ज प्राप्त झालेस त्यावर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
- करारपत्रात मुद्दा क्रं 8.C VI नुसार जर एखादा कंत्राटी अधिकारी/कर्मचारी ३ महिने विनापरवानगी रजेवर/गैरहजर असल्यास त्याची सेवा समाप्त होईल अशी नविन अट समाविष्ट करण्यात आली आहे. सदर अटीनुसार वैद्यकिय अधिक्षक सर्व व वैद्यकिय अधिकारी, नागरी आरोग्य केंद्र सर्व यांनी अशा कर्मचाऱ्यांचे सेवासमाप्त करणेचे प्रस्ताव जिल्हास्तरावर जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, एनएचएम यांचेकडे सादर करावेत.
- अभियानांतर्गत विविध स्तरावर पदभरती करण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशात नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत असुन ही नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रकल्प संपुष्टात येईपर्यंत किंवा करारपत्र कालावधी समाप्ती नंतर संपुष्टात येईल.

**(डॉ. महेश खलिपे)**
**सदस्य सचिव**
**जिल्हा कार्यकारी समिती**
**तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद सातारा**

प्रति-

वरील नमुद उमेदवार